**पोलीस आयुक्तालय,सोलापूरशहर**
**नवीन प्रशासकिय इमारत,गाधीनगर,सोलापूर413003**
**दुरध्वनी क्र.०२१७-२७४४६१३ फॅक्स क्र.०२१७-२७४४६१८**
**Email Id- cp.solapur@mahapolice.gov.in**


दि.१२/०३/२०२६

## प्रेसनोट

पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर आस्थापनेवर ७३ पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी आवेदन अर्ज भरलेल्या उमेदवारांची शारिरिक मोजमाप व मैदानी चाचणी दि.११/२/२०२६ ते दि.१४/२/२०२६ रोजी पोलीस मुख्यालय,सोलापूर शहर येथील कवायत मैदानावर घेण्यात आली आहे. सदर मैदानी चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून १:१० या प्रमाणात ८८६ **(६५५ पुरुष व २३१ महिला )** उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी पात्र करण्यात आले आहे. लेखी परीक्षेसाठी पात्र करण्यात आलेल्या ८८६ उमेदवारांची लेखी परीक्षा ही दि.१५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या कालावधीत एस.व्ही.सी.एस.हायस्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, एमआयडीसी, अक्कलकोट रोड,सोलापूर येथे घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षेचे हॉलतिकिट महाआयटी कडून उमेदवारांच्या ईमेल वर पाठविण्यात आलेले आहेत. तरी उमेदवारांनी परीक्षेसाठी येताना या कार्यालयाकडून मैदानी चाचणीचे वेळी देण्यात आलेले ओळखपत्र, महाआयडीकडून लेखी परिक्षेसाठी दिलेले हॉलतिकीट, ०२ पासपोर्ट साईज फोटो सोबत घेवून यावेत. उमेदवारांना या कार्यालयाकडून पॅड व काळे पेन देण्यात येणार असून याव्यतिरिक्त उमेदवारांनी त्यांचेसोबत इतर कोणत्याही वस्तू उदा.पेन, पेन्सिल, खोडरबर, मोबाईल, डिजीटल डायरी, मायक्रोफोन,मायक्रो कॅमेरा डिव्हाईस,कॅलक्युलेटर,डिजीटल नोटपॅड,नोटस पुस्तके,ईअरफोन,हिअरिंग एड डिव्हाईस,स्मार्ट वॉचेस, स्मार्ट आय ग्लासेस,चिप इत्यादी वस्तू आणू नयेत.

उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी दि.१५/०३/२०२६ रोजी परिक्षा केंद्रावर सकाळी ८.०० वाजता उपस्थित रहावे. उशिरा आलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी बसु दिले जाणार नाही,तरी उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी वेळेत उपस्थित रहावे. तसेच उमेदवारांनी परिक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचा प्रयत्न करु नये.जर उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्यांचेविरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परिक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**( गौहर हसन )भा.पो.से**
**पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)**
**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर.**